# खान्देश दुर्गवारी

योगेश आहिरे



लेखन - योगेश चंद्रकांत आहिरे.

९८२०८८१२२५

ahireyogesh25@gmail.com

सी-२०४, अलिशान सोसायटी,
ओल्ड लुर्डस शाळेसमोर,
मुरबाड रोड, कल्याण (प.)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

मुखपृष्ठ , मांडणी आणि सजावट : सचिन काकडे

www.esahity.com

esahity@gmail.com

eleventh floor, eternity
eastern express highway
Thane, 400604

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी

ई .साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे-

©esahity Pratishthan®2015

# अर्पण पत्रिका

" माझ्या डोंगर भटकंतीत कुठल्याही प्रकारची आडकाठी न करणाऱ्या माझ्या कुटुंबीयांस.
व आत्तापर्यंतच्या भटकंतीत मोलाचे मार्गदर्शक ठरलेल्या **श्री. ई.एन.नारायण** यांना अर्पण."

# प्रस्तावना

तसे पाहिले तर हि 'खान्देश दुर्गवारी' म्हणजे खुप काही मोठी मोहिम मुळीच नव्हती. पण अचानक आलेल्या पावसाने शिडकावा करून वातावरण रोमांचित करून टाकावे, तसे या अचानक ठरलेल्या मोहिमेतील, नितांत सुंदर दुर्ग पाहून रोमांचित झालो.

कागदावरचे नियोजनप्रमाणेच सर्व काही जुळून आले. यासाठी मोहिमेतील सर्वांचे सहकार्य मोलाचे ठरले. विशेष म्हणजे स्थानिक गावकऱ्यांची चांगलीच मदत झाली. योग्य मार्ग, योग्य रस्ता दाखविणे. प्रत्येक ठिकाणाबाबत शक्य होईल तितकी अचूक माहिती देणे. या सर्व गोष्टींमुळे वेळेची मोठी बचत होऊन सहाच्या सहा दुर्ग आम्हाला व्यवस्थित नियोजना प्रमाणे पहाता आले.

मुळातच कुठलीही मोहिम अथवा कोणताही रूट ट्रेक यशस्वी होण्यामागे तिथल्या स्थानिक गावकऱ्यांचा मोठा सहभाग असतो. त्यासाठी स्थानिंकाबरोबर सुसंवाद होणे फार महत्वाचे ठरते.

माझ्याकडून जेवढे शक्य झाले तेवढे मी लिहीण्याचा प्रयत्न केला आहे. हे वाचून तुम्हाला त्या भागात जावेसे वाटले अथवा जाऊन आल्यावर अजुन काही सुचवावे वाटले तर नक्की कळवा. माझ्याकडून यासाठी कोणतीही माहिती हवी असल्यास जरूर संपर्क साधा.

तसेच हे पुस्तकरूपी दुर्गवारी आपल्यापर्यंत पोहचवण्याची संधी दिल्याबद्दल ई-साहित्य प्रतिष्ठानच्या सर्व चमुचे मनापासुन आभार !

योगेश चंद्रकांत आहिरे

# पुर्व तयारी, प्रस्थान

कधी कधी अचानक ठरवलेली मोहिम पण खुप काही मिळवुन देते, सगळ्याच गोष्टी मनासारख्या घडतात. कागदावरचे नियोजन तंतोतंत अंमलात येते, सरतेशेवटी गोड आठवणी आणि चांगला सुखद अनुभव देऊन जाते. असेच काही आमच्या बाबतीत घडले. बुधवारी दुपारी अचानक मनात आले, या शनिवार रविवार एखादा चांगला ट्रेक करूया. लगेच माझे स्नेही ज्येष्ठ गिर्यारोहक श्री.ई.एन.नारायण (अंकल) यांना फोन लावला. त्यांनी होकार दिला, मला म्हणाले "आप बोलो किधर जाने का" माझ्या मनात प्लान तयार होता, भीमाशंकर कर्जत या भागातल्या घाटवाटा. जसे की वांजत्री, फेण्यादेवी, कुसुर अशा अल्प परिचित घाटवाटा,या बाबतीत माझे 'डिस्कवर सह्याद्रीकार साईदा' बरोबर बोलणे झाले. पण सध्याची पावसाची स्थिती व अंदाज पाहून आमचे काही नक्की होत नव्हते. हो-ना करत तो दिवस तसाच गेला. गुरूवारी सकाळी माझ्या मनात आणखी एक वेगळा प्लान तयार झाला तो म्हणजे 'खान्देश दुर्गवारी'. मी असा अंदाज बांधला की आपल्या भागात(कोकण पट्टा) पाऊस जास्त असेल तर खान्देश परगण्यात जाऊ, आणि जर कमी झाला तर मग वरिल पैकी भीमाशंकर भागातली एखादी घाटवाट करू.

सायंकाळी परत नारायण अंकलचा फोन

"योगेश, क्या करने का बोलो ? घाटवाट करने का क्या ?"

मी: "अंकल बारीश कम हुआ तो ठिक नही तो कुछ और"

अंकल: "अच्छा तो ठिक है, जैसे आप बोलो."

मी: "और मतलब, धुळे नाशिक साईड चलते है, ये मौसम मे वहा जाना ठिक रहेगा."

अंकल: " वो तो मालुम है, एकदम बढिया बोलो फिर ?"

मी: "लळींग, सोनगीर, गाळणा, कंक्राळा, डेरमाळ और पिसोळ"

( नाशिक मालेगाव-धुळे खान्देश भागातले हे नितांत सुंदर किल्ले )

अंकल: "अरे वाह! क्या बात है, चलो फिर. लेकिन दो दिन मे बहोत घाई होगा."

मी: "चलो फिर तीन दिन शनि, रवि, सोम.

गुरूवार रात्री पासून माझे मन त्या भागात फिरू लागले, डोळ्यासमोर ते सुंदर किल्ले व तो मुलुख तरळु लागला.

शुक्रवारी सकाळीच मोहिमेचा फायनल प्लान तयार केला.

शनि. दिवस १ला :


कल्याणहून भल्या पहाटे निघून झोडगे शिवमंदिर-लळींग-सोनगीर- मुक्कामी गाळणा. अंदाजे अंतर ४०० किमी.

रवि. दिवस २ रा :

गाळणा - कंक्राळा- मुक्कामी डेरमाळ.अंदाजे अंतर ८० किमी.

सोम. दिवस ३ रा :

डेरमाळ - पिसोळ - ताराहाबाद सटाणा मार्गे कल्याण परत. अंदाजे अंतर ३०० किमी.



हाच प्लान आमच्या नाशिकच्या अनुभवी गिर्यारोहक मित्र श्री. हेमंत पोखरणकर यांना दाखविला. त्यांचा लागलीच प्रतिसाद, 'परफेक्ट प्लान आहे, यात डेरमाळलाच थोडा वेळ लागतो तोही परफेक्ट घेतलाय तुम्ही.'

मग काय त्यांचे आभार मानून, लगेचच प्लानवर शिक्कामोर्तब करून टाकले. सामानाची तयारी व आवराआवरी करून डोंगर पिशवी तयार ठेवली.

पण खरे सांगु तर शुक्रवारी रात्री काही केल्या झोपच लागेना, आत्ता पर्यंत बरेच ट्रेक करून झालेत, सहसा मला असे कधी होत नाही पण या वेळेस मात्र मी भलताच एक्साईट झालो होतो. पहाटे चार वाजता गजर वाजला, उठून तयारी करून पाच वाजता गाडी घेऊन अंकलच्या घरी पोहचलो.

ई.एन.नारायण (अंकल), विवेक नारायण ही बाप-लेकाची जोडी, मिलिंद कोचरेकर आणि मी. असे आम्ही चौघे जण गाडीच्या डिकीत सामान व्यवस्थित भरून निघालो. आता सुरू झाली होती आमची 'खान्देश दुर्गवारी'.- किल्ले "लळींग, सोनगीर, गाळणा, कंक्राळा, डेरमाळ आणि पिसोळ" आग्रा रोड वर आल्यावर गाडीत डिझेल पूर्ण भरून घेतले. पुढे शहापूर खर्डी कसारा ते थेट ईगतपुरी घोटी पर्यंत मस्त पाऊस लागला, रस्ता पण रहादारी मुक्त होता. आठ वाजता नाशकात दाखल झालो, तर चक्क ऊन पडले होते.

पुढे दिड तासात चांदवडला आधिशक्ती रेणुकामाता मंदिरात दर्शनासाठी थांबलो, इथे पण पाऊस नव्हता, पण वातावरण एकदम छान. निवांतपणे दर्शन करून, बाहेरच चहा नाश्ता घेऊन पुढील प्रवासाला लागलो. मालेगाव नंतर साधारणपणे अर्ध्या तासाच्या अंतरावरच्या 'झोडगे' येथील प्राचीन हजार बाराशे वर्षापूर्वीच्या शिवमंदिरापाशी थांबलो. अंबरनाथ व रतनवाडी येथील मंदिराशी साधर्म्य असलेल्या ह्या मंदिरावर बऱ्यापैकी कोरीव शिल्पकाम केलेले आहे. याच आवारात बाजूला आणखी एक छोटे पडझड झालेले मंदिर आहे.



सध्या मंदिरात पुरातत्व खात्याचे डागडुजीचे काम चालु आहे. महादेवाला नमन करून, मोहिमेतल्या पहिला किल्ला लळींगला रवाना झालो. तीस ते चाळीस मिनिटात लळिंग गावी पोहचलो. महामार्गाच्या डाव्या हाथाला, माथ्यावर तटबंदी धारण केलेला लळिंग किल्ला दिसला.
गावातल्या जुन्या दगडी इच्छापुर्ती महादेव मंदिराजवळ गाडी लावली.





मंदिराच्या डाव्या बाजूच्या ठळक पायवाटेने किल्ला चढायला सुरूवात केली. वाट डाव्या बाजूने वर चढते, थोडे अंतर गेल्यावर एक पीराचे थडगे दिसते.

तसेच आणखी पुढे चढून गेल्यावर वाट तटबंदी जवळ येऊन उजवीकडे वळते. पुढे कातळात काही गुहा दिसतात.






मग पडझड झालेल्या दरवाजातून गडमाथा गाठला. माथ्यावर उजव्या बाजूची तटबंदी पहात उत्तर टोकाला पोहचलो.

इथुन समोर धुळे शहर खाली माचीवर कोरडा तलाव व गोल घुमटी दिसते. मागे फिरून एक ऊंचवटा चढून, पलिकडे एक मंदिर व दारूकोठार दिसले.








त्याच्या जवळच्या कातळात भुमीगत पाण्याचे टाके आहे.




समोरच तट आहे.



त्याच्या अलीकडून चोर दरवाजाने खाली उतरलो,





इथेही उजव्या हाताला पाण्याचे टाके आढळले. खाली उतरून वळसा मारून त्या कोरड्या तलावापाशी आलो. वाटेत पलिकडे दिवाणमळा गाव दिसते. तलावाजवळची घुमटी बऱ्यापैकी चांगल्या स्थितीत आहे.

किल्यावर एकंदरीत गुरांचा वावर बराच आहे. त्यात सावली देणारी मोठी झाडे पण नाहीत, निवडुंग व काटेरी झुडुपांचे प्रमाण जास्त आहे. दोन अडीच तासात गड दर्शन करून गावात आलो. महामार्गावर धुळे शहराच्या पुढे दुपारचे जेवण करून, तीन साडेतीनच्या सुमारास सोनगीर गावात पोहचलो.

गावात शिरल्यावर डाव्या हाताला सोनगीर किल्ला दिसतो. गावात नव्याने बांधलेल्या कमानीतूनच वाट वर चढायला लागते, पण सुरूवातीला मात्र नाक पकडून जावे लागले एवढी भयाण दुर्गंधी त्या वाटेवर होती. वाट मोठी क्रॉंक्रिटची आहे व जोडीला लाईटाचे खांब हि आहेत. दहा ते पंधरा मिनिटात पडक्या दरवाज्यात पोहचलो.





पुढे काही कातळकोरीव पायरा चढून गडमाथा गाठला.



माथा बऱ्यापैकी सपाट आहे, वरती फारशी झाडी नाहीत.





दक्षिणेला निमुळत्या बाजूला तटबंदीचे अवशेष आहेत. मागे फिरल्यावर वाटेत नाणेघाटाच्या दगडी रांजणाची आठवण येणारे छोटेखानी गोलाकार बांधकाम दिसले.

पुढे गेल्यावर दिसली ती या किल्यावर असलेली भली मोठी, खुप खोल असणारी आयताकृती विहीर.
बघितल्यावर किती खोल आहे याचा अंदाज येत नाही. तळाला पाणी होते पण पोहऱ्याशिवाय काढता येणे कठिण.





त्याच एका बाजूला कोरडी पुष्करणी दिसली, चार पडक्या भिंतीत प्रत्येकी पाच कोनाडे आहेत. समोरच उत्तर टोकाचा छोटेखानी बुरूज दिसला.
इथुन मात्र चांगला नजारा मिळाला. दुरवर पुर्वेला डोंगरगाव धरण, खाली मुंबई आग्रा व मागच्या बाजूला धुळे शहादा महामार्ग नजरेस पडतात.

गडफेरी आटपून आम्ही दीड तासात खाली आलो. नियोजनानुसार आम्हाला आजच गाळणा किल्यावर जायचे होते. सोनगीरहून परत धुळ्याला येऊन उजवी मारून पारोळा- साक्री रोड पकडला तो थेट नेर कुसुंबे पर्यंत. पाऊस तर या भागात नव्हताच पण तरी रस्त्याच्या दोन्ही बाजूला बाजरीची शेती मोठी मोहक वाटत होती. एकंदरीत बरीच हिरवळ त्या सांयकाळच्या वातावरणात एक तेज आणत होती. थोडक्यात काय तर असा रस्ता असेल तर गाडी चालवायला अजुनच मजा येते. पुढे कुसुंबे हून डावीकडे वळून डोंगराळे आणि मग पुढे जवळच असलेल्या गाळणा गावात पोहचलो तेव्हा सांयकाळच्या सुर्य प्रकाशात गाळणा किल्ला खासच उठून दिसत होता. गाडी, खाली असलेल्या गोरखनाथाच्या मठात व्यवस्थित पार्क केली. पहाटे कल्याण सोडल्यापासून आत्तापर्यंतचा ३८५ किमी प्रवास झाला होता.  मुक्काम गडावर करायचा असल्यामुळे, डोंगरपिशव्या पाठीवर चढविल्या.



मठातून निघताना, एकाने विचारले : ‘आता सायंकाळी वरती जाणार, मग परत कधी येणार ?’
मी: ‘आम्ही वरती मुक्काम करणार आहोत’. तर तो म्हणाला, " वर फॉरेस्टवाले येतात."
मी: ‘ठिक आहे, बघुया काय ते.’
बाहेर आल्यावर डावीकडच्या रस्त्याने गडाच्या दिशेला चालु लागलो. एकदम प्रशस्त वाट आहे.

मध्येच गडाचा ईतिहास व माहिती दर्शक फलक लावला आहे.



वाटेत आणखी दोघे तिघे आमच्याकडे पाहून म्हणाले, "ऊपर जा रहे हो, अभी थोडी देर मे अंधेरा हो जायेगा, वहा जानवर और शेर है." हे ऐकून काय बोलावे, त्यांच्याकडे कानाडोळा करून पुढे निघालो. बरिच पिकनीक टाईप मंडळी वाटेत दिसली. आम्ही फक्त सुर्यास्त होण्याआधी वर मुक्कामी पोहचायचे या हेतूने पाऊले पटापट टाकत जात होतो.

लगेच पहिला दरवाजा, खालच्या अंगाची तटबंदी लागली. दरवाज्यात पहारेकऱ्यांच्या देवड्या आहेत.

पुढे दुसऱ्या दरवाज्यावरती एक शिलालेख कोरलेला दिसला. सरळ पुढे गेल्यावर दिंडी दरवाजा दिसला.





त्याच्या अलीकडे उजवीकडे वळून तिसऱ्या दरवाज्यात पोहचलो. तो पार करून डावीकडच्या बाजूने , चौथ्या दरवाजातून बाहेर आल्यावर, उजवीकडचा नजारा तर खुपच सुंदर.... ती कमनीय तटबंदी आणि त्यावर बांधलेले ते



कलात्मक सज्जे म्हणजे हवा खाण्यासाठी पंचतारांकित बाल्कनीच जणु.



त्यातला एक फक्त दोन खांबावर ऊभा आहे आणि दुसऱ्या सज्जात ( बाल्कनी ) व्यवस्थित जाता येते.



इथुनच आपण आलो ती वाट व किल्ल्याचे दरवाजे दिसतात.



पुढे गेल्यावर डावीकडे कातळात सहा गुहा दिसल्या, त्यापैकी तिसऱ्या गुहेत महादेवाची पिंड व एका जोड गुहेत पाणी आहे.

आणखी पुढे गेल्यावर तटबंदी आणि वरच्या बाजूचा बुरूज दिसतो. फोटोग्राफी करून, परत चौथ्या दरवाज्यातून वर आल्यावर समोरच पांढरा रंगाचा दर्गा दिसला. जो खाली गावातून स्पष्ट दिसतो.



सामान दर्ग्यात ठेवून, मागच्या बाजूला' विवेक' पिण्याच्या पाण्याचे टाके शोधायला गेला. सुर्यास्त होत आला होता, दर्ग्याच्या खिडकीतून ते दृश्य न्याहाळत बसलो. पाण्याचे टाके विवेकला दिसले, पडक्या तीन भिंतीत छोटेखानी कुंडासारखे बांधलेले हे टाके, पटकन नजरेस पडणार नाहीच. त्याच्या आजुबाजूला एक दोन मोठी शेवाळलेली टाकी आहेत.

सर्व पाणीसाठा व्यवस्थित भरून ठेवला. अंकलनी झटपट फक्कड चहा तयार केला, चहासोबत दिवसभराचा शारीरिक थकवा त्या खिडकीतून सुर्यास्ताच्या छटा पाहत कुठच्या कुठे पळाला. रात्री मस्त मुगाची खिचडी पोटभर खाऊन झोपी गेलो.

सकाळी उजाडण्याआधीच जाग आली ती खालच्या गोरखनाथ मठाच्या घंटानाद / लाऊडस्पीकरच्या आवाजाने. लगेच दर्गाच्या गच्चीवर गेलो. पूर्वेला धुरकट ढगाळ वातावरणात सुर्योदय फारसा दिसला नाही. दुरवर पुसटसा लंळीग दिसला, कंक्राळा ओळखण्याचा प्रयत्न केला. खाली परत उतरून चहा झाल्यावर, लगेच पोहे बनविण्याच्या कार्यक्रम, अंकलने तयार केलेले स्वादिष्ट पोहे खाऊन. सगळी स्वच्छता व आवराआवर करून सामानासकट गडमाथ्यावर निघालो.

पाचेक मिनिटात छोटे टेकाड चढून वर गेलो. माथ्यावर झाडी फार विरळ त्यातही बहुतांश सीताफळांची झाडे. वरती काही कबरी व जुन्या वाड्यांचे बांधकाम आहे.

इथुन गडाची अजुनही चांगल्या स्थितीत असलेली तटबंदी नजरेस पडते. काही ठिकाणी तटबंदी वरून चालत जाता येते.








तटबंदीत जंग्या व तोफांसाठी झरोके केलेले आहेत.





माथ्यावरून तासभरात गडफेरी पूर्ण करून खाली गाळणा गावात आलो. पुन्हा सर्व सामान गाडीत टाकून पुढचा किल्ला कंक्राळासाठी निघालो. आमचा नियोजीत मार्ग हा पुन्हा डोंगराळे गावातून दहिडी मार्गे, करंजगव्हाण - लेंडाणे वरून उजवीकडे वळून दाबिल मार्गे कंक्राळा हा होता. सवयीप्रमाणे,खाली गाळणा गावात रस्त्याची चौकशी केली. तर त्यांनी मधला शॉर्टकट रस्ता सांगितला, त्याप्रमाणे डोंगराळे गावात परत जाण्याची काहीच गरज नाही. आमचे बरेच अंतर कमी व वेळ ही वाचणार होता.

मठाच्या

बाहेर मुख्य रस्त्यावर आल्यावर, लगेचच उजव्या हाथाला एक छोटा दर्गा लागला तिथुन उजवीकडे वळालो. आता गाळणा किल्ला आमच्या उजव्या बाजुला दिसत होता. सरळ रस्ता पकडून ५ ते ६ किमी गेल्यावर टिघरी गावाच्या अलिकडे दहिडी साठी डावीकडे वळालो.

वाटेत हा एक आगळावेगळा बंगला (?) दिसला.



दहिडी पासून सरळ करंजगव्हाण गावातल्या पुला पलीकडच्या पेट्रोलपंप पासून उजवी मारली, हा आमचा दुसरा शॉर्टकट होता. जो डायरेक्ट कंक्राळा गावाच्या जवळ मधल्या रस्त्यावर मिळणार होता. थोडे अंतर पुढे गेल्यावर जो पहिला उजवीकडे रस्ता वळेल तो रस्ता पकडायचा होता. बरोबर तिथे पोहचलो, उजवीकडच्या रस्त्याचे काम चालु दिसले. गाडी बाजुला घेऊन, उतरून परत एकाला विचारले. तो म्हणाला, "हाच रस्ता आहे." मी म्हणालो "हे तर काम चालू आहे, गाडी कशी जाणार ?"

बाजुला मोठे डंपर उभे, रस्त्यावर मोठी मोठी खडी. मग शांतपणे विचार केला, परत माघारी फिरलो तर पुन्हा करंजगव्हाण लेंडाणे मार्गे फिरून जावे लागेल. आत्ता पर्यंत टिघरीहून दहिडीत आलो तो रस्ता पण मातीचा आणि रेतीमिश्रीत होता, तरी त्यातला त्यात बरा होता. घड्याळाचे काटे पुढे सरकत होते. मनात एक विचार आला कंक्राळा सोडून परस्पर डेरमाळ ला जावे, पण नाही दुरवर किल्ला दिसतोय आणि असा विचार नाहीच करायचा.

आमची घालमेल बघून चक्क डंपरचा चालक पुढे येऊन म्हणाला, "हे फक्त सुरूवातच आहे, पुढे रस्ता मातीचा पण ठिकठाक आहे. एवढा भाग जपुन पार करा, मी सांगतो तुम्ही निघून जाशाल." त्याचे बोलणे ऐकून हुरूप आला. पण टोकदार खडीभरल्या रस्त्यावर ‘डिझायर’ सारखी कार घालायची, गाडीला काही झाले तर, बरेच विचार मनात

आले. तसाच गाडी जवळ आलो, लगेच सुचले गाडीतले वजन कमी करूया, निदान तेवढीच रिस्क कमी . ठरलेतर तिघांना थोडे अंतर चालायला सांगितले, 'विवेक' पुढे पळत मोठी व टोकदार खडी हेरायचा प्रयत्न करून मला सांगत होता.१०- १५ मिनिटात तो टप्पा पार करून, परत सर्वांना गाडीत सामावून मातीच्या कच्चा रस्त्यावरून सावकाश गाडी चालवत कंक्राळा गावात एकदाचे पोहचलो. गावाच्या मागून, शेताच्या बाजूने देवीच्या मंदिरापर्यंत अत्यंत कच्चा रस्ता गेलेला आहे. मग काय, पुन्हा त्याच रस्त्याने बरेच चढ-उतार, खाच खळगे पार करत, मंदिराजवळ गाडी लावली.



समोरच किल्ला दिसत होता. मोजकेच सामान व पाण्याचा आवश्यक साठा घेऊन, भर दुपारी आम्ही 'कंक्राळा' चढाई साठी निघालो. वातावरण ढगाळ असल्यामुळे उन्हाचा तडाका नव्हता. किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत शेती केलेली आहे. तसेच गाई गुरे शेळ्या मेंढ्या तर पार किल्ल्यावरती पण दिसत होत्या.

किल्याकडे पाहिल्यावर मुख्य खिंड नजरेस पडते, तिच्या वरच्या बाजूला निरखून पाहिल्यावर पडिक तटबंदी दिसली. किल्ला उजव्या हाथाला ठेवून, खिंडीच्या दिशेने वर चढायला सुरूवात केली.



२० मिनिटात खिंडीच्या उजव्या बाजूला कातळात असलेल्या टाक्यापाशी आलो. एकाच रेषेत ४ ते ५ टाकी आहेत.







पुन्हा खिंडीतून थोडे वर चढून, तटबंदीकडून किल्ल्याच्या उजवीकडच्या माथ्यावर आलो. माथ्यावर झाडी जवळपास नाहीच, पण बरिच मोठी शेवाळलेल्या पाण्याची टाकी व काही चौथरे आहेत.





समोरच आमचा कालचा मुक्काम असलेला

तटबंदीयुक्त ‘गाळणा’ किल्ला दिसला. गडमाथा फारसा मोठा नाही. पुन्हा खिंडीच्या वरच्या अंगाला येऊन समोर डावीकडचा उंचवटा चढून गेलो. इकडे पण पडिक तटबंदीचे अवशेष वगळता काही नाही. पण या किल्ल्यावरून आजुबाजुचा पूर्ण मुलुख व्यवस्थित न्याहाळता येतो. दुरवर नामपूर गावाच्या दिशेला पाऊस पडताना दिसत होता. अचानक गार वारे वहायला लागले. आल्या मार्गे खिंडीतून खाली उतरलो. शेवटी मंदिरापर्यंत जाताना पावसाची बारीक सर आम्हाला भिजवून गेली.एव्हाना २ वाजून गेले होते. परत कंक्राळा गावात आल्यावर एका घरापाशी

आमची विचारपूस केली. कुठून आलात ? कुठे निघालात ? 'दिपक पाटील' हे त्या विचारपूस करणाऱ्या व्यक्तीचे नाव.
मी : "कल्याणहून आलोय, कंक्राळा किल्ला पाहिला, आता अजग मार्गे नामपूरहून डेरमाळ ला जाणार आहोत."
दिपक : "एक काम करा, एवढ्या लांबतीन फिरसन कशाले जाई राहिनात, मी तुमले एक मधला रस्ता सांगस. मी आत्तेच नामपूरतीन म्हनी गाडी लई वनु. तुमना २० ते २५ किमी वाचतील"
त्यांच्या महिंद्रा पिकअप कडे पाहून मी म्हणालो, " काका तुमची गाडी कुठल्याही रस्त्यावर चालणार, पण तो रस्ता ही कार जाईल असा आहे का ?"
दिपक: "हो, फक्त थोडा रस्ता खराब शे, पण तुम्ही लवकर जाई लागशाल."
पुन्हा बदल करावा लागणार होता, पण अंतर कमी होऊन वेळ वाचणार असेल तर काय वाईट आहे. तसेही काही करून आजच सायंकाळी डेरमाळ मुक्कामी जायचे आहे. त्यांनी सांगितलेला रूट असा होता: नामपूरच्या दिशेने गेल्यावर पहिलीच उजवी मारा, मग पुढे पहिल्या डावीकडे वळा, थोडे सरळ गेल्यावर पुन्हा उजवीकडे मग टिपे, मोरधर हि गावं सोडून सरळ वडनेरच्या पुढे नामपूर.

हे उजवा डावा गणित थोड अवघड होतं पण लगेच एका कागदावर लिहून घेतले. अगदीच वाटले तर वाटेत कोणाला तरी विचारू की. चला पाहुया काय होईल ते, त्यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही सुरूवात केली. काही ठिकाणी खराब खडी, डांबर उकरल्यासारखा रस्ता होता, पुढे तर चक्क मातीचा रस्ता सुरू झाला. आजुबाजूचे शेतात काम करणारी मंडळी आमच्याकडे पाहत होती. काही जागी भर चिखलातून व पाण्यातून गाडी टाकावी लागली. एका ठिकाणी तर चक्क शेताच्या बांधावरून पायवाट जाते तसा रस्ता होता, एका वेळी एकच गाडी जाऊ शकेल असा तो मधला भाग पटापट पार केला. मग परत कच्चा पण रूंद रस्ता लागला. वाटेत सांगितलेली टिपे, मोरधर ही गावं पार करून नामपूरात दाखल झालो. ध्यानात आले की दुपारचे जेवणाचे काय ? घड्याळात ३ वाजत होते. तसे आमचे बरेच अंतर व वेळ वाचला होता. चला तर जेवण करूनच निघू, पण नामपूरात आम्हाला काही चांगले हॉटेल मिळाले नाही. मग चौकशी केल्यावर कळाले की साक्री रोड ला काही चांगले धाबे आहेत. नाहीतरी डेरमाळसाठी साक्री रोडवरूनच जायचे होते. पुढे वाटेत २ ते ३ किमी अंतरावर 'समाधान' नावाच्या धाब्यात जेवणासाठी थांबलो. चिकन

हंडी, काजू भाजी, चपाती, जीरा राईस. मग काय, मनसोक्त जेवण करून निघायला साडेचार वाजले. मनात विचार आला, अंधार पडायच्या आधी डेरमाळची मुक्कामी गुहा सापडेल ना. पाहुया पुढे काय ते, नामपूर - साक्री हा रोड पण सुंदर, रस्त्याच्या दुतर्फा वडाची मोठी झाडे व दोन्ही बाजूला हिरवी शेतं, कुठे बाजरी तर कुठे ऊसाची तयारी तर कुठे डाळींबाच्या बागा. पुढे' वरचे टेंबे' या गावापासून डावीकडे वळून पुढे सरळ श्रीपुरवाडे मार्गे 'टिंघरी' या डेरमाळच्या पायथ्याच्या गावी पोहचलो. सायंकाळचे साडेपाच सहा झाले होते. आजचा प्रवास फक्त ७० किमी पण बरीच ऑफ रोड ड्राईव्ह झाली होती.

टिंघरी गावात शिरल्यावर एका घरापाशी गाडी उभी केली. लगेच चौकशी करण्यासाठी काही उत्साही मंडळी हजर झाली. पुन्हा तेच कुठून आलात, कुठे निघालात, काय काम करतात, पेपरात छापता काय, तुम्ही असेच फिरत असतात का ? ते अगदी ' शुटींग लेवाणे वनात का, चला मी तुमले पुर्ण किल्ला दखाडी आणस, पण शुटींग एक नंबर व्हाल पाहिजे.' असे सुध्दा एकाने सांगितले. गाडी भोवती बरीच गर्दी जमु लागली. सगळ्यांचे शंका निरसन केल्यावर कमी झाली.

एव्हाना सायंकाळचे सहा वाजून गेले होते. आता चढाईला सुरूवात केली तर वर जाई पर्यंत नक्कीच अंधार पडणार आणि या मोहिमेतील सर्वांत जास्त चाल व चढाई हि या डेरमाळ किल्ल्याचीच होती, त्यात अंधारात मुक्कामाची गुहा, पिण्यायोग्य पाणी सापडणे पण अवघड होणार. मनात आलेला हा विचार लगेच अंकल जवळ बोलून दाखविला. थोड्या चर्चेनंतर आमच्या समोर दोन पर्याय होते.

पर्याय १- उशिर झाल्यामुळे टिंघरी गावातच मुक्काम करून सकाळी शक्य तितक्या लवकर निघून गडदर्शन करून दुपार पर्यंत गावात येऊन पिसोळ कडे रवाना होणे. ( जास्त वेळ लागला तर, पिसोळ बाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले.)

पर्याय २- आत्ताच गडावर मुक्कामी जाऊन दुपारच्या आत खाली उतरून, पिसोळ किल्ला पाहून सायंकाळी कल्याणला रवाना होणे. (यात फक्त गुहा आणि पिण्यायोग्य पाण्याचे टाके सापडणे हे महत्वाचे होते.) या साठी गावातून वाटाड्या घेणे गरजेचे होते.

आम्ही पर्याय- २ निवडला. तेवढ्यात ज्या घरासमोर गाडी लावली होती, तिथले आजोबा बाहेर आले. त्यांच्या सोबत बोलणे झाल्यावर ते म्हणाले, 'थांबा कुणीतरी येईल संगतीला.' त्यांच्या सांगण्यानुसार समोरच्या घरातले ‘सुनिल पवार’ आमच्या सोबत येण्यास तयार झाले.

टिंघरी गावाच्या उजव्या हाथाला डेरमाळ किल्ल्याची पठारवजा सोंड उतरली आहे. डाव्या हाथाला पिसोळच्या रांगेतले पठार आहे. पिसोळहून डेरमाळला परस्पर ट्रेक करताना, टिंघरीत उतरून पुन्हा याच वाटेने डेरमाळवर जावे लागते. गाडीतून सर्व सामान काढून पाठीवर चढविले. गावातून उजव्या हाथाला चालु पडलो, वाट हळूहळू तिरक्या रेषेत वर चढू लागली. समोर पठारावरून गाई गुर, शेळ्या मेंढ्या त्यांच्या घराकडे परतत होत्या. चढाईच्या त्या अरूंद वाटेत ते समोर आल्यामुळे चांगलीच तारांबळ झाली. गुरांचा हा दररोजचा दिनक्रम ठरलेला, कदाचित त्यामुळेच त्या चढाईच्या अरूंद वाटेतली माती उकरली गेल्यामुळे प्रचंड घसारा झालाय. हि वाट वर चढत असताना डाव्या हाथाला दरी आणि खाली टिंघरी गाव दिसते. पाऊण तासात ती घसारायुक्त वाट पार करून पठारावर आलो. सुर्यास्त झाला होता, समोरच्या दोन छोट्या टेकड्यांना वळसा घालून डेरमाळच्या समोर असलेल्या लांबच लांब अशा हिरव्यागार पठारावर आलो. या किल्ल्याला एकंदर खुपच मोठे पठार लाभले आहे. समोरच झाडीभरला डेरमाळ आणि त्याच्या उजव्या बाजूच्या कड्यात काही गुहा दिसत होत्या. थोडे अंतर चालल्यावर टॉर्च चालू केल्या, सुनिलच्या मागोमाग आम्ही आपले चालत होतो. खरंच त्या अंधारात वाटेबद्दल फारसे काही समजतच नव्हते. पुढे चढ लागला, ऐके ठिकाणी वळसा घालुन झाडीतून वर आल्यावर कातळकोरीव पायऱ्या लागल्या. मग साधारण अर्ध्या तासाच्या चालीनंतर टाक्यांच्या समुहाजवळ आलो. सुनिलने दाखविल्या प्रमाणे बाजूच्याच एका टाक्यातून पिण्याचे पाणी भरून घेतले. पुढे छोटे टेकाड चढून, डाव्या बाजूने पुर्ण झाडीतून चालत मुक्कामाची गुहा गाठली. स्थानिक लोक या गुहेला 'कोरडी वखार' म्हणतात. गुहेत आत जाण्यासाठी मान वाकवून खाली बसून उतरत जावे लागत होते. एकंदर भूमीगत प्रकाराची ही गुहा. लगेच आतमध्ये जाऊन शक्य तितक्या बारकाईने टॉर्च मारून चारही बाजूंना व्यवस्थित पाहून घेतले, गुहेत खाली माती व एका बाजूला दगडांचा खच पडला होता.

सामान गुहेत ठेवले व गुहेच्या बाहेरच जास्तीचे वाढलेले गवत साफ करून रात्रीच्या जेवणासाठी स्टोव्ह पेटवला. गावातून निघाल्यापासून जवळपास अडीच तास झाले होते. विवेकने मस्त पैकी मसाले भात तयार केला जोडीला पापड आणि लोणचे. जेवण झाल्यावर गुहेच्या वरच्या बाजूच्या कातळावर जाऊन बसलो. वर बऱ्यापैकी निरभ्र आकाश मिणमिणत्या चांदण्यांचे तारांगण, बाजूला मधूनच शांतता छेदणाऱ्या बेडूक व रातकिड्यांचा आवाज. त्यात गार वाऱ्याची मंद झुळुक मध्येच सुखावुन जात होती. बराच वेळ तिथेच रेंगाळलो, नंतर खाली गुहेत जाऊन झोपी गेलो.




सकाळी जाग आली ती पाखरांच्या किलबिलाटाने, ऊठून बाहेर आलो तर डोळ्यांवर विश्वासच बसत नव्हता, काल रात्री कसे त्या झाडीभरल्या वाटेने पायपीट करून गुहेपर्यंत आलो.

लवकरच चहा नाश्ता करून तिथुन निघालो, गुहेच्या वरच्या कातळावरून गडमाथा गाठला.



वर गणपतीची व मारूतीची मुर्ती दिसली, पुढे काही जुने अवशेष आहेत.





माथ्यावरून सेलबारी-डोलबारी रांगेतले साल्हेर, मुल्हेर, मांगी तुंगी व अलीकडे भामेर यांचे व्यवस्थित दर्शन झाले. फोटोत उजव्या बाजूला साल्हेर दिसत आहे.

माथ्यावरून पलीकडच्या बाजूला उतरून, काल अंधारात बघितलेल्या टाकी समुहापाशी आलो.

हाताशी थोडा वेळ होता, मग काय लगेच अंघोळीचा ठराव मंजुर झाला. त्या सकाळच्या वातावरणात अंघोळ केल्यावर, शरिरात एक वेगळीच तरतरी आली, एकदम फ्रेश.





पुढे थोडे गेल्यावर पठारावर हे बांधकाम दिसले.

उजवीकडे उतरून हरिश्चंद्रगडाच्या कोकणकडा सारखाच डेरमाळचा प्रसिध्द असा 'भैरव कडा' लागला.

स्थानिक लोक याला 'बहिराम कडा' म्हणतात, कड्यावरच हा 'भैरमदेव' आहे.






कडा अंदाजे सात आठशे फूट सरळसोट तुटलेला आहे आणि पुढे तीव्र उतार खालच्या बाजूला प्रतापपूर गाव दिसते. डावीकडे समोरच पिसोळ किल्ला दिसतो.

फोटोग्राफी करून, परत खाली उतरून किल्ल्याच्या डाव्या बाजूला चालू लागलो.





बऱ्यापैकी वळसा घालून पुढे कातळात खोदलेले पाण्याचे टाके व एक नैसर्गिक गुहा.

ह्याच त्या गुहा ज्या आम्हाला पठारावरून उजव्या बाजूला आम्हाला दिसल्या होत्या.
पुन्हा माघारी येऊन, मुख्य वाटेने खाली पठारावर उतरू लागलो वाटेत पडझड झालेली तटबंदी नजरेस पडली.
पठारावरून भराभर पावले टाकत





पुन्हा त्या घसारायुक्त वाटेने दुपारच्या आत टिंघरी गावात उतरलो. सुनिल पवार यांचे आभार प्रदर्शन करून त्यांचा निरोप घेऊन वाडी पिसोळ कडे निघालो. टिंघरी ते श्रीपुरवाडेपासून उजवी मारून जायखेडा रोड पकडला पण लगेचच दहा मिनिटांच्या अंतरावर एका चौफुली पासून परत उजवीकडे वळालो,

हा रस्ता आम्हाला सुनिलने सांगितला. अन्यथा आमचा नियोजीत मार्ग टिंघरी-श्रीपुरवाडे-जायखेडा- नांदिन- वाडी पिसोळ हा साधारण २० किमी चा मार्ग होता. थोडक्यात हा शॉटकर्ट पण फायद्याचा ठरला.

वाडी पिसोळ गावातून किल्ल्याच्या पायथ्याशी असणाऱ्या मारूतीच्या पारापर्यंत कच्चा गाडी रस्ता आहे. अगदी कंक्राळाच्या पायथ्याच्या रस्ता सारखा किंबहूना जरा जास्तच अरूंद एका वेळी एकच छोटी गाडी जाईल, बऱ्या पैकी मोठ्ठाली खडी व चढउतार असलेला. आजुबाजूला शेतजमीन आणि मधोमध तो अरूंद कच्चा रस्ता, सावकाशपणे गाडी चालवत उघड्या चौथरावरच्या मारूतीच्या अलीकडे एका घराजवळ गाडी उभी केली. थोडे खायचे पदार्थ व पिण्याचे पाणी बरोबर घेतले.

एव्हाना दुपारचा एक वाजून गेला होता. समोरच पिसोळ किल्ला दिसत होता.



किल्ल्याच्या दोन भागामुळे त्यामध्ये तयार झालेली खिंड दिसली. ( काही प्रमाणात कंक्राळा सारखी ) मारुतीरायाला नमस्कार करून त्याच्या मागच्या टळक पायवाटेने खिंडीच्या दिशेने निघालो. वाट अगदी ठळक असल्यामुळे चुकण्याचा प्रश्नच नाही. थोडे अंतर गेल्यावर डावीकडे एक पीर दिसला, फॉरेस्टवाल्यांनी विश्रांतीसाठी काही चौथरे उभारले आहेत. वाट चढणीला लागून डावीकडे खिंडीच्या दिशेला वळाली. पुढे डाव्या हाथाला रांगेत पाण्याच्या दोन मोठ्या टाक्या दिसल्या.

भर दुपारी त्या कडक ऊन्हात घामाघुम होत चढाई करताना खुपच कंटाळा येत होता.ऑगस्ट महिन्यातले दिवस असुनही पावसाचा मागमुस नव्हता. पण निव्वळ दुर्ग प्रेमापायी या सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करीत, साधारणपणे,अर्ध्या तासात खिंडीत पोहचलो. जवळच तटबंदी व दरवाज्याची ढासळलेली कमान आहे. थोडे वर गेल्यावर डाव्या हाथाला तीन गुहा दिसल्या, त्यामध्ये पाणी आहे व एका गुहेसमोर महादेवाची पिंड व नंदी आहे.



पुढे लगेच गडमाथ्यावर आलो, गडमाथ्याचे साधारणपणे दोन भाग पडले आहे.



डावीकडच्या भागात एका ऊंचवट्यावर छोटेखानी वाड्याचे जुने बांधकाम आहे आणि वाटेत काही शेवाळलेल्या पाण्याच्या टाके आहेत.

वाडाच्या मागील बाजूने अलीकडे असलेल्या तटबंदी वर गेलो. समोर मांगी तुंगी आणि खाली सेलबारी घाटातला ताराहाबाद- पिंपळनेर रस्ता दिसला.

पुन्हा खिंडीच्या दिशेला परतून, गडाच्या दुसऱ्या बाजूला आलो.

वाटेत मोठे तळे व काही अवशेष नजरेस पडले.



पुढे कड्याच्या डाव्या बाजूला दोन मोठ्या टाक्या दिसल्या, इथुनच डेरमाळचा कड्याचा भाग स्पष्ट दिसतो.





टाक्याजवळून सरळ पुढे चालत शेवटच्या टोकावरच्या बुरूजावर गेलो. बुरूजावर छोटासा दरवाजा (?) दिसला.

बुरूजावरून  खाली पाहिले कि मध्ये भलीमोठी खाच दिसते. ती खाच पाहून धोडपची आठवण झाली.



बुरूजावरून नजारा बाकी झकास. डावीकडे डेरमाळ किल्ला व उजवीकडे दुरवर चौलेर किल्ला दिसला. मागच्या महिन्यातल्या सह्यमेळावाच्या आठवणी जाग्या झाल्या. घड्याळ्यात पाहिले तर साडेचार वाजून गेले होते. पूर्ण किल्ला पाहताना वेळ कसा गेला ते कळालेच नाही. गड उतरायला सुरूवात केली, पाऊण तासात खाली गाडीजवळ आलो.



आता परतीचा प्रवास सुरू होणार होता, पल्ला बराच लांबचा होता. पुन्हा त्या कच्या रस्त्यावरून वाडी पिसोळला आलो, तेथुन उजवीकडे वळून जायखेडा मार्गे सरळ ताराहाबाद गाठले. तिथेच सायंकाळचा चहा घेऊन सटाणा-नाशिक रोड पकडला. वाटेत देवळा सोडल्यावर भावड बारीच्या दिशेने जात असताना सातमाळा रांगेतले भाईबंद खुणावत होते, त्या सांयकाळच्या संधीप्रकाशात ते भलतेच उठून दिसत होते. स्टेअरींग वरून हाथ फिरवताना, मनात तीन दिवसांच्या आठवणी उफाळून येत होत्या. पुन्हा पुन्हा साद घालणारे हे खान्देशातले दुर्ग.
खऱंच या सहा दुर्गांचा षट्कार घडून आमची खान्देश दुर्गवारी सफल झाली होती.



- समाप्त -

# ई साहित्य प्रतिष्ठान

कुठलीही भाषा चांगली किंवा वाईट नसते. आपली भाषा ती आपली भाषा. जशी दोन मातांची तुलना करता येत नाही तशी दोन मातृभाषांचीही करू नये. आपण आपली भाषा समृद्ध करण्यासाठी काय करता येईल ते करावे. बस्स.

तर तसे अनेक चांगले मराठी लोक चांगलं काही करायचा प्रयत्न करत असतात. काही चांगले लोक चांगलं मराठी लिहायचा प्रयत्न करत असतात. आणि हे चांगलं जास्तीत जास्त मराठी लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न आम्ही करतो. दर महिन्याला डझन अर्धा डझन पुस्तकं प्रकाशित करतो. ती सुमारे तीन लाख  वाचकांपर्यंत पोहोचवतो. आजवर हजाराच्या घरात पुस्तकं प्रकाशित केली आहेत.

यावर खुष व्हावं. अजिबात नाही.

बारा कोटी लोकांची भाषा मराठी. त्यातले निदान सहा कोटी साक्षर.

आणि वाचक किती? तीन लाख?

बहुत नाइन्साफ़ी है.

मराठीतला प्रत्येक साक्षर वाचक व्हायला हवा. मोबाईलचा वाढता प्रसार आणि इंटरनेटचा वाढता व्याप पहाता, हे शक्य आहे. होय. हे शक्य आहे.

मराठी ई बुक्स चे वाचक कोटीच्या संख्येत असायला हवेत.

हे कोण करणार?

तुम्ही!

तु

तुम्ही आपल्या ओळखीच्या  किमान दहा लोकांचे ई मेल पत्ते आम्हाला द्या. त्यांना वाचक बनवण्यासाठी आम्ही जंग जंग पछाडू. ते शंभर लोकांना वाचक बनवतील. लाखांचे कोटी व्हायला कितीसा वेळ लागणार**?**

सर्व प्रकारच्या वाचकांसाठी आम्ही पुस्तकं बनवतो. बालसाहित्यापासून ते गूढ कथांपर्यंत आणि ज्ञानदेव तुकारामांच्या संत साहित्यापासून ते अगदी कामसूत्रापर्यंत. प्रत्येक तऱ्हेच्या वयाच्या**,** निवडीच्या**,** आवडीच्या वाचकासाठी आम्ही पुस्तकं बनवतो आहोत. अगदी कृषी आणि रेसिपी सुद्धा.

मित्रांनो. या अभिनव अभियानात सामिल व्हा.
दहा लोकांना वाचक बनवा.
दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला कळवा.

असे ई मेल आय डी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही **VIP** वाचक दर्जा देतो. .

आमचा पत्ता  :esahity@gmail.com
अधिक माहितीसाठी भेट द्या  :www.esahity.com

आपले नम्र
टीम ई साहित्य प्रतिष्ठान